ePaper

संयुक्त राष्ट्रांमध्ये पाक पंतप्रधानांचा 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये 'विजया'चा दावा



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 27 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीची हक्काची!




पोलिस दलात खळबळ; बेपत्ता कर्मचाऱ्याचा निगडीत मृतदेह

## ३७८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त; राज्य शासनाचा मोठा निर्णय

# महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर

महाईन्यूज । मुंबई

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला असून, २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. राज्यातील विविध भागांत झालेल्या पीकहानीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात येणार आहेत.**

दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पीक कर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी संबंधित कर्जांच्या वसुलीस स्थगिती देण्यात येणार आहे. कृषी पंपाच्या चालू वीजबिलातही सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

दुष्काळग्रस्त भागातील शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्यात येणार आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांचे निकष शिथिल करून अधिकाधिक कामे सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगाराची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांना आदेश काय?

दरम्यान, येत्या 5 ऑक्टोबरपासून पंचनामे करण्यात येणार आहेत. या पंचनाम्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पिकांची स्थिती दाखवणारे छायाचित्र, जीपीएस संकलित करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवस राज्यातील दुष्काळी भागाची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला होता. दोन दिवसात दुष्काळाचा जीआर काढण्याचे आश्वासनही त्यांनी दिले होते. त्यानंतर आज मुख्यमंत्र्यांनी दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

दुष्काळ जाहीर केलेल्या गावांमध्ये आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची वीज जोडणी खंडित न करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी आणि मजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करण्याच्या उपाययोजनांचाही शासन निर्णयात समावेश आहे.

राज्यात एकूण ३८७ तालुके असून त्यापैकी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. शासनाच्या जारी केलेल्या यादीत कोकण, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर विभागातील विविध तालुक्यांचा समावेश आहे. यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांचाही समावेश आहे.दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी आणि ग्रामीण भागाला दिलासा देण्यासाठी या उपाययोजना तातडीने राबविण्याचे शासनाने निश्चित केले आहे.

### पीक कर्जापासून... विविध उपाययोजना जाहीर

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार,जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीला स्थगिती, कृषीपंपाच्या चालू वीजबिलात सूट (7.5 हॉर्सपॉवर क्षमतेच्या वीजपंपांचे वीज बिल आधीच माफ, आता त्यावरील वीजपंपांनाही सूट), शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजना अंतर्गत नियमात शिथिलता आणून अधिकाधिक कामे सुरु करणार, आवश्यक त्या ठिकाणी पिण्याचे टँकर्स पुरवणार, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची वीजजोडणी खंडित होणार नाही, शेतीवर आश्रित शेतकरी/शेतमजूर यांना अन्नधान्य पुरवणार, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था करणार, जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेणार, पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाणी यासाठी आधीच्या आदेशाप्रमाणे नियोजन सुरुच ठेवणार, आदी उपाययोजना फडणवीस यांनी जाहीर केल्या आहेत.



# भीमाशंकर खोऱ्यात मुसळधार पावसाचा कहर

## दरडी, झाडे कोसळली, भातखाचरे वाहून गेली; कोंढवळचा रस्ता ठप्प

**महाईन्यूज । पुणे**

**आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील भीमाशंकर खोऱ्यात बुधवारी रात्री झालेल्या ढगफुटीसदृश मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास पावसाने अचानक रौद्ररूप धारण केल्याने कोंढवळ आणि तेरुंगण परिसरात दरडी कोसळण्याबरोबरच मोठमोठी झाडे उन्मळून पडली. तेरुंगण गावठाण ते वनदेव परिसरात रस्त्यावरील मोऱ्यांचे कठडे तुटल्याने पाण्याचा प्रवाह बदलला आणि रस्त्यालगतचे बांध तसेच भातखाचरे वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.**



बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला मध्यम स्वरूपाचा असलेला पाऊस रात्री उशिरा अचानक जोरदार झाला. काही वेळातच मुसळधार पावसामुळे परिसरात ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली. रात्रभर पाऊस सुरू राहिल्याने डोंगर उतारावरून पाण्याचे लोंढे वाहू लागले. अनेक ठिकाणी रस्त्यांवर माती, दगड आणि झाडे आल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला.

भीमाशंकर मुख्य रस्त्यापासून कोंढवळकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठी दरड कोसळली असून त्यावर मोठमोठी झाडेही पडली आहेत. त्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे ठप्प झाला आहे. डोंगर-दऱ्यांच्या कुशीत वसलेल्या कोंढवळ गावासाठी हा प्रमुख मार्ग असल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली आहे. अरुंद आणि धोकादायक रस्त्यावरूनच ग्रामस्थांना दैनंदिन प्रवास करावा लागतो. त्यातच दरड कोसळल्याने गावाचा संपर्क तुटण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

कोंढवळमधील अनेक ग्रामस्थ रोजगार, व्यवसाय आणि रोजीरोटीसाठी भीमाशंकर, तळेघर, घोडेगाव आणि मंचर येथे दररोज ये-जा करतात. विद्यार्थ्यांनाही शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते. रस्ता बंद झाल्याने रुग्ण, विद्यार्थी तसेच रोजंदारीवर जाणाऱ्या नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. प्रशासनाने तातडीने दरड आणि झाडे हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

तेरुंगण गावाच्या हद्दीत गावठाण ते वनदेव परिसरालाही मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला. रस्त्याच्या मोऱ्यांचे कठडे तुटून पाण्याचा प्रवाह बदलल्याने रस्त्यालगतचे बांध आणि भातखाचरे वाहून गेली. ऐन भातशेतीच्या हंगामात झालेल्या या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. तेरुंगण परिसरातील रस्ते, मोऱ्या, बांध आणि भातखाचरांच्या नुकसानीची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आदिवासी सोसायटी, तळेघरचे उपाध्यक्ष रामदास लोहकरे यांनी केली. पावसाचा जोर पुन्हा वाढल्यास डोंगर उतारावरील दरडींचा धोका कायम असल्याने प्रशासनाने खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

### तेरुंगणमध्ये भातखाचरांचे नुकसान

तेरुंगण गावाच्या हद्दीत गावठाण ते वनदेव परिसरालाही मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला. रस्त्याच्या मोऱ्यांचे कठडे तुटून पाण्याचा प्रवाह बदलल्याने रस्त्यालगतचे बांध आणि भातखाचरे वाहून गेली. ऐन भातशेतीच्या हंगामात झालेल्या या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

## पुण्याची विसर्जन मिरवणूक ३१ तासांनंतरही सुरूच; टिळक चौकात मंडळांची गर्दी

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्याच्या वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणुकीला यंदा मोठा विलंब झाला असून, ३१ तास उलटूनही शहरातील प्रमुख मार्गांवर गणेश मंडळांच्या मिरवणुका सुरूच आहेत. टिळक चौकातून आतापर्यंत २५० हून अधिक गणेश मंडळे मार्गस्थ झाली असली, तरी अद्याप मोठ्या संख्येने मंडळे विसर्जनासाठी रांगेत आहेत. त्यामुळे यंदाची मिरवणूक आणखी किती तास चालणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.**

### ढोल-ताशा, डीजेमुळे वेग मंदावला?

मिरवणूक लांबण्यामागे ढोल-ताशा पथकांमधील वादकांची संख्या, वादनासाठी घेतला जाणारा वेळ आणि डीजे ही कारणे असल्याचे चित्र आहे. रात्री १२ नंतर डीजे बंद करण्यात आला होता. त्यानंतर लक्ष्मी रस्ता वगळता इतर तीन मार्गांवरील अनेक मिरवणुका थांबल्या. सकाळी ६ नंतर डीजे पुन्हा सुरू झाल्यानंतर मिरवणुकीला वेग आला.



मानाच्या पाच गणपतींचे विसर्जन पूर्ण झाले आहे. मात्र त्यानंतर सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांची मोठी संख्या आणि मिरवणुकीचा संथ वेग यामुळे विसर्जन सोहळा लांबत चालला आहे. लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता आणि केळकर रस्त्यावरून मंडळे टिळक चौकाकडे येत आहेत.

टिळक चौकातून एका वेळी एकच मंडळ पुढे जात असल्याने मिरवणुकीचा वेग मंदावला आहे. चौकाच्या दोन्ही बाजूंना असलेले मांडव, भाविकांची गर्दी आणि विविध मार्गांवरून एकाच वेळी येणारी मंडळे यामुळे मोठी कोंडी निर्माण झाली आहे. पोलिसांकडून मंडळांना पुढे नेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मिरवणूक लांबण्यामागे ढोल-ताशा पथकांमधील वादकांची संख्या, वादनासाठी घेतला जाणारा वेळ आणि डीजेचा आवाज ही कारणे असल्याचे चित्र आहे. रात्री १२ नंतर डीजे बंद करण्यात आला होता. त्यानंतर लक्ष्मी रस्ता वगळता इतर तीन मार्गांवरील अनेक मिरवणुका थांबल्या. सकाळी ६ नंतर डीजे पुन्हा सुरू झाल्यानंतर इतर मंडळांच्या मिरवणुकांनाही सुरुवात झाली.

गेल्या काही वर्षांतील विसर्जन मिरवणुकीचा कालावधी पाहता २०२२ मध्ये ३० तास, २०२३ मध्ये ३१ तास, २०२४ मध्ये ३० तास २७ मिनिटे, तर २०२५ मध्ये तब्बल ३४ तास ४४ मिनिटे मिरवणूक सुरू होती. त्यामुळे यंदाचा कालावधी किती राहणार, याकडे लक्ष लागले आहे.

पुण्याच्या गणेश विसर्जन सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून आणि परदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचे सूर, डीजेचा आवाज आणि गुलालाची उधळण करत गणेशभक्त बाप्पाला निरोप देत आहेत. अद्याप मोठ्या संख्येने मंडळे मार्गस्थ होणे बाकी असल्याने यंदाच्या विसर्जन मिरवणुकीची सांगता लांबण्याची शक्यता आहे.

# पोलिस दलात खळबळ; बेपत्ता कर्मचाऱ्याचा निगडीत मृतदेह

## दोन दिवसांपासून सुरू होता शोध; सरकारी पिस्तूल घटनास्थळी सापडल्याने तपासाला वेग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मागील दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील एका कर्मचाऱ्याने सेवा पिस्तुलातून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे शनिवारी (दि. २६) सकाळी उघडकीस आले. निगडीतील ट्रान्सपोर्टनगर बस डेपो परिसरात त्यांचा मृतदेह आढळून आला. कौटुंबिक वादानंतर ते बुधवारी (दि. २३) घरातून निघून गेले होते.**






विजय मोतीलाल कोळी (वय ३६) असे मृत पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते पिंपरी-चिंचवड पोलिस दलात कार्यरत होते. त्यांच्या पत्नी सारिका विजय कोळी यांनी याबाबत चिखली पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कोळी हे आरटीपीसी म्हणून कार्यरत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास कोळी घरातून निघून गेले. त्यानंतर ते घरी परतले नाहीत. जाताना त्यांच्याकडे सरकारी पिस्तूल असल्याचे समोर आल्यानंतर पोलिस यंत्रणेने त्यांचा शोध सुरू केला होता. त्यांचे शेवटचे लोकेशन निगडीतील दुर्गादेवी टेकडी परिसरात आढळल्याने त्या भागात पोलिसांनी व्यापक शोधमोहीम राबवली. ड्रोनच्या साहाय्यानेही परिसर पिंजून काढण्यात आला होता.

दरम्यान, शनिवारी सकाळी निगडी ट्रान्सपोर्टनगर येथील बस डेपो परिसरात कोळी यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी सरकारी पिस्तूलही मिळून आले. प्राथमिक तपासात त्यांनी त्याच पिस्तुलातून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड पोलिस दलात हळहळ व्यक्त होत आहे. चिखली पोलिस तपास करीत आहेत.

### शोधमोहीमेला अखेर पूर्णविराम

विजय कोळी बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांसह पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू होता. दुर्गादेवी टेकडी परिसरात शेवटचे लोकेशन मिळाल्यानंतर पोलिसांनी ड्रोनच्या मदतीनेही शोधमोहीम राबवली. अखेर शनिवारी ट्रान्सपोर्टनगर परिसरात त्यांचा मृतदेह आढळला. या घटनेमुळे कुटुंबीय आणि पोलिस दलावर शोककळा पसरली.



# स्मशानभूमीतील रॅम्प धोकादायक; दुरुस्तीची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपळे गुरव येथील स्मशानभूमीचे नूतनीकरण करण्यात आले असले, तरी प्रवेशद्वाराजवळ तयार करण्यात आलेल्या रॅम्पची रचना नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते नितीन सोनवणे यांनी केली आहे. या रॅम्पची तातडीने पाहणी करून सुरक्षित, कमी उताराचा आणि नॉन-स्लिप रॅम्प तयार करण्याची मागणी त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

सोनवणे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, स्मशानभूमीत प्रवेश करताना आणि बाहेर पडताना असलेल्या रॅम्पवर मोठ्या आकाराचे कडप्पे बसविण्यात आले आहेत. ते ज्या पद्धतीने बसविण्यात आले आहेत, त्यामुळे अंत्यविधीसाठी तिरडी घेऊन खाली उतरताना नागरिकांची चप्पल किंवा पाय अडकण्याची शक्यता आहे. तसेच उतारावरून जाताना घसरण्याचा धोका असून विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अडचण होऊ शकते, असे त्यांनी म्हटले आहे. तिरडी घेऊन उतरताना एखाद्या व्यक्तीचा पाय घसरला किंवा कडप्प्यात अडकून तोल गेला, तर तिरडीसह मृतदेह खाली पडण्यासारखी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता असल्याची भीतीही सोनवणे यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने रॅम्पची तातडीने पाहणी करावी, धोकादायक ठरणारी सध्याची रचना आवश्यकतेनुसार काढावी आणि तिरडी सहज व सुरक्षितपणे नेता येईल असा मजबूत, योग्य उताराचा आणि घसरण नाही असा रॅम्प तयार करावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

स्मशानभूमी सारख्या संवेदनशील आणि सार्वजनिक वापराच्या ठिकाणी सौंदर्यापेक्षा नागरिकांची सुरक्षितता आणि सुविधा यांना प्राधान्य देऊन तांत्रिकदृष्ट्या योग्य सुधारणा कराव्यात, अशी मागणी सोनवणे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

# भरधाव बुलेटची रिक्षाला पाठीमागून धडक; रिक्षाचालकाचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालविलेल्या बुलेट मोटारसायकलने पुढे जाणाऱ्या रिक्षाला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने रिक्षाचालकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि. २४) रात्री साडेअकराच्या सुमारास न्यू बीआरटी रोडवरील अपूघरजवळील बसथांब्याशेजारी घडली. या प्रकरणी रावेत पोलिसांनी २० वर्षीय बुलेटचालकाला अटक केली आहे.**



अनिल श्रीपतराव तांबे असे मृत रिक्षाचालकाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांच्या ४० वर्षीय पत्नीने रावेत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चिन्मय महेश बरीदे (वय २०, रा. बाणेर, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक केलेल्या बुलेटचालकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिन्मय बरीदे हा बुलेट (एमएच १४ एमपी ३५५५) भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत होता. त्याने अनिल तांबे हे चालवत असलेल्या रिक्षाला (एमएच १४ जेपी १५८६) पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर तांबे रस्त्यावर कोसळले. त्यांच्या छाती, डोके, चेहरा आणि कमरेला गंभीर दुखापत झाली. या अपघातात रिक्षाचेही मोठे नुकसान झाले. गंभीर दुखापतीमुळे तांबे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक कुंभार पुढील तपास करीत आहेत.

### भरधाव वेगाचा बळी

रावेतमध्ये भरधाव बुलेटने रिक्षाला पाठीमागून दिलेल्या धडकेत रिक्षाचालक अनिल तांबे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जीव गेला. अपघातानंतर पोलिसांनी २० वर्षीय बुलेटचालकाला अटक केली असून, रावेत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



## भूमिका

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या दोन दिवसांत शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना जाणून घेतल्या. हा केवळ पाहणी दौरा नव्हता; सत्तेच्या केंद्रातून बाहेर पडून सत्तेचा अर्थ ज्या सामान्य माणसासाठी आहे, त्याच्यापर्यंत जाण्याचा तो प्रयत्न होता.**

# मुख्यमंत्र्यांनी दाखवली वाट, अधिकारी कधी चालणार?



शेतकऱ्यांचा आक्रोश, त्यांच्या अडचणी आणि त्यांच्या अपेक्षा याची पूर्वकल्पना मुख्यमंत्र्यांना असणारच. प्रशासनाकडून अहवालही मिळत असतील. तरीही कागदावरील आकडेवारीवर विसंबून न राहता त्यांनी प्रत्यक्ष बांधावर जाणे पसंत केले, हे महत्त्वाचे आहे.

प्रशासनाच्या अहवालात ‘पीक नुकसान’ अशी नोंद असते; मात्र बांधावर गेल्यावर त्या नुकसानीची खरी किंमत शेतकऱ्याच्या डोळ्यांत दिसते. कागदावर ‘मदत आवश्यक’ असे लिहिलेले असते; पण प्रत्यक्ष भेटीत त्या मदतीची निकड जाणवते. मुख्यमंत्री स्वतः शेतकऱ्यांशी संवाद साधत असतील, तर प्रशासनानेही या संवादाची परंपरा पुढे नेणे अपेक्षित आहे. प्रशासन हे सरकारचे दुसरे चाक आहे. मग सचिव, आयुक्त, जिल्हाधिकारी आणि विभागप्रमुख यांनीही कार्यालयाच्या चौकटीबाहेर पडून परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला नको का?

विविध विभागांच्या सचिवांना जिल्हा पालक सचिव म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांनी आपल्या जिल्ह्यात नियमित जाऊन नागरिकांच्या समस्या समजून घेणे ही केवळ औपचारिकता न राहता प्रशासनाच्या कामकाजाचा भाग व्हायला हवी. अधिकारी हा केवळ फाइल पुढे नेणारा हात नसतो. तो शासन आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. फाइलवरील सहीने निर्णय होतो; पण प्रत्यक्ष भेटीतून शासनाविषयी विश्वास निर्माण होतो. लोकसेवेच्या खुर्चीवर बसलेल्या अधिकाऱ्याने नागरिकांना भेटणे हा उपकार नसून कर्तव्य आहे. दुर्मुखलेला चेहरा, भेटीसाठी टाळाटाळ आणि अधिकाराचा अनाठायी आविर्भाव यांचा लोकसेवेशी संबंध नाही.

पूर्वी मंत्री आणि अधिकारी यांच्यात मतभेद असले तरी राज्यहिताचा मुद्दा केंद्रस्थानी असे. मंत्री निर्णय घेत असे; अधिकारी त्याला नियम, अनुभव आणि वस्तुस्थितीची चौकट दाखवत असे. प्रशासनाचा धर्म सत्तेची सोय पाहणे नसून शासनाला वस्तुस्थिती सांगणे हा आहे. राजकीय नेतृत्वाला जनतेसमोर उत्तर द्यावे लागते; अधिकाऱ्यांनीही आपल्या प्रशासकीय जबाबदारीतून जनतेच्या प्रश्नांचा खरा आवाज सरकारपर्यंत पोहोचवला पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी बांधावर जाऊन एक संदेश दिला आहे—शासनाने जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे. आता प्रशासनानेही तो संदेश स्वीकारण्याची वेळ आली आहे.

मुख्यमंत्री शेतकऱ्याच्या खांद्यावर हात ठेवत असतील, तर अधिकाऱ्यांनी त्या अश्रूंचे कारण शोधले पाहिजे. दुष्काळग्रस्तांना केवळ मदतीच्या घोषणा नव्हे, तर वेळेवर मदत, संवेदनशील संवाद आणि प्रशासनाची प्रत्यक्ष उपस्थिती हवी आहे.शासन मोठ्या इमारतीत बसते; पण राज्य खरे तर गावच्या चावडीवर, शेताच्या बांधावर आणि सामान्य माणसाच्या विश्वासात जगते. दुष्काळ जमिनीवर पडतोच; पण तो माणसाच्या मनातही उतरतो. त्या मनातील कोरडेपणा दूर करण्यासाठी आता अधिकाऱ्यांनीही कार्यालयातून बाहेर पडून बांधावर जाणे गरजेचे आहे.

## प्रासंगिक »

### हुशार शेतकरी

**एका गावात गोविंदा नावाचा शेतकरी राहत होता. त्याचे शेत डोंगराच्या उतारावर होते. एकदा मुसळधार पावसाची शक्यता असल्याचे त्याला समजले. गावातील अनेक शेतकरी मात्र म्हणाले, “पाऊस पडला तर पाहू, आधीच एवढी धावपळ कशाला?”**

गोविंदाने मात्र वेळ न घालवता शेताच्या कडेला छोटे बांध मजबूत केले. पाण्याचा निचरा होण्यासाठी चर खोदले आणि घरातील धान्य सुरक्षित ठिकाणी हलवले.

दोन दिवसांनी जोरदार पाऊस झाला. डोंगरावरून मोठ्या वेगाने पाणी शेताकडे आले. अनेक शेतांतील माती वाहून गेली; काहींचे धान्यही भिजले.

गोविंदाच्या शेतातील बांध मजबूत असल्याने पाणी नियंत्रित झाले आणि त्याचे पीक वाचले. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी त्याला विचारले, “तुला संकट येणार हे कसे कळले?”

गोविंदा हसून म्हणाला, “संकट येण्याची वाट पाहत बसलो असतो, तर तयारी करायला उशीर झाला असता. संकट टाळण्यासाठी आधीच केलेली छोटी तयारी मोठे नुकसान वाचवते.”

- तात्पर्य : संकट येण्यापूर्वी केलेली तयारीच खरा शहाणपणा आहे.

निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे ही लोकशाहीसाठी गंभीर बाब आहे.

# निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेची कसोटी!




मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) पार्श्वभूमीवर दोन निवडणूक आयुक्तांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत गेल्या दहा महिन्यांत किमान १४ वेळा आक्षेप नोंदवल्याचे वृत्त समोर आले आहे. हे आक्षेप मतदार नोंदणी, नावे वगळणे, मतदारयादीतील दुरुस्ती आणि निवडणूकविषयक माहितीच्या व्यवस्थापनासारख्या मूलभूत बाबींशी संबंधित असल्याने त्यांचे गांभीर्य अधिक वाढते.

या आक्षेपांमध्ये काही निर्णय आपल्याला विश्वासात न घेता घेण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. फॉर्म-६ मधील बदल, मतदारांच्या माहितीच्या केंद्रीकरणाबाबतचे प्रश्न आणि पश्चिम बंगालमधील मतदारयादीविषयक अपील यांचा त्यात समावेश आहे. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने हे आक्षेप अंतर्गत विचारविनिमयाचा भाग असल्याचे सांगत गेल्या काळातील सर्व निर्णय तिन्ही आयुक्तांच्या एकमताने झाल्याचे स्पष्ट केले आहे.

म्हणूनच या वादाचा केंद्रबिंदू कोण बरोबर आणि कोण चूक हा नसून संस्थात्मक पारदर्शकता हा असायला हवा. निवडणूक आयोगातील मतभेद असतील तर ते नोंदविले जाणे ही संस्थेच्या कार्यपद्धतीतील बाब असू शकते; मात्र मतदारांना त्या प्रक्रियेविषयी पुरेशी स्पष्टता मिळणे आवश्यक आहे. विशेषतः मतदारयादीत नाव असणे हा मतदानाच्या अधिकाराचा पाया असल्याने नाव जोडणे किंवा वगळणे यासंबंधीची प्रक्रिया स्पष्ट, तपासता येण्याजोगी आणि नागरिकांना समजणारी असणे गरजेचे आहे. एसआयआरच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयानेही काही बाबींची दखल घेतली आहे.

दिल्लीतील एसआयआरमध्ये ‘लॉजिकल डिस्क्रेपन्सी’च्या नावाने दिलेल्या नोटिसांबाबत न्यायालयाने आयोगाकडून स्पष्टीकरण मागितले आहे. निवडणूक आयोगाची स्वायत्तता ही लोकशाहीची महत्त्वाची हमी आहे; पण स्वायत्ततेसोबत विश्वासार्हताही तितकीच आवश्यक आहे. राजकीय पक्ष आयोगावर आरोप करतील, त्याला प्रत्युत्तरही देतील; परंतु आयोगाने आपल्या प्रत्येक प्रक्रियेची विश्वासार्हता जनतेसमोर सिद्ध करणे हेच महत्त्वाचे. मतदाराला आपल्या नावाबाबत, मतदानाच्या अधिकाराबाबत आणि निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत शंका वाटू नये, हीच खरी कसोटी. सध्याच्या वादामुळे आयोगासमोर केवळ प्रशासकीय नव्हे, तर ‘विश्वास’ टिकविण्याची घटनात्मक परीक्षा उभी राहिली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



गेली वीरसरी ।
मग त्यासि रांड मारी ॥१॥

मग नये तैसी सत्ता ।
गेली मागील आणितां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.)
विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# निवडणूक आयोगाविरोधात ठाकरे बंधूंचा जनमोर्चा

## ४ ऑक्टोबरला मुंबईत आंदोलन; एसआयआर प्रक्रियेविरोधात मनसे-उद्धवसेना एकत्र

**महाईन्यूज | मुंबई**

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जनमोर्चाची हाक दिली आहे. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत हा जनमोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिली. हा मोर्चा केवळ दोन पक्षांपुरता मर्यादित न राहता सर्वपक्षीय जनमोर्चा व्हावा, यासाठी विविध राजकीय पक्षांशी संवाद साधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.**



केंद्रीय निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेसह काही निर्णयांवरून विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर मनसे आणि उद्धवसेनेने एकत्र येत जनमोर्चाची घोषणा केली आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे मोर्चाची माहिती देताना महाराष्ट्रातील जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

राज ठाकरे यांनी म्हटले आहे की, मोर्चाच्या आयोजनात मनसे आणि शिवसेनेचा पुढाकार असला तरी हा केवळ एका पक्षाचा मोर्चा नसून जनतेचा आवाज ठरावा, अशी भूमिका आहे. त्यामुळे राज्यातील सर्व राजकीय पक्षांशी संवाद साधून त्यांना मोर्चात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

एसआयआरच्या नावाखाली मतदारांची फसवणूक होत असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे. तसेच देशातील लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी नागरिकांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. मोर्चाची वेळ आणि नेमके ठिकाण लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या निर्णयांवरून सुरू असलेल्या राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर ४ ऑक्टोबरच्या या जनमोर्चाकडे लक्ष लागले आहे. या मोर्चात कोणते राजकीय पक्ष सहभागी होतात, याबाबतही उत्सुकता आहे.

### ४ ऑक्टोबरला मुंबईत जनमोर्चा

मनसे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या पुढाकाराने ४ ऑक्टोबरला मुंबईत जनमोर्चा काढण्यात येणार आहे. एसआयआर प्रक्रियेला विरोध करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या मोर्चात सर्व राजकीय पक्षांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे. मोर्चाची वेळ आणि ठिकाण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

---

# नीला विखेंनी फटकारलं, लंकेंनी डिवचलं; विखे पिता-पुत्रांवर दुहेरी हल्ला!



**महाईन्यूज | अहिल्यानगर**

**स्वीडनच्या संसदेत खासदार म्हणून निवड झालेल्या नीला विखे पाटील यांच्या विधानानंतर अहिल्यानगरमधील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. नीला यांनी काका राधाकृष्ण विखे पाटील आणि चुलत भाऊ सुजय विखे पाटील यांच्याशी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ संपर्क नसल्याचे सांगितले. तसेच, आपल्या राजकीय यशाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी म्हटले. या पार्श्वभूमीवर खासदार निलेश लंके यांनी एक्सवर केलेली पोस्ट चर्चेत आली आहे.**

राधाकृष्ण विखे पाटील आणि सुजय विखे पाटील यांनी नीला यांच्या स्वीडनच्या संसदेत झालेल्या निवडीबद्दल सोशल मीडियावर शुभेच्छा दिल्या होत्या. मात्र, त्यानंतर नीला यांनी माध्यमांशी बोलताना विखे पाटील कुटुंबीयांशी आपला गेल्या दशकभरापासून संपर्क नसल्याचे सांगितले. आपण भारतात नियमितपणे येत असलो तरी खासदार झाल्यानंतर आपल्या यशाचे कौतुक केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

नीला यांच्या या विधानानंतर निलेश लंके यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले, "आपले कर्तृत्व एवढे मोठे करा की, कालपर्यंत ओळख न देणाऱ्यांनी आज तुमचे नाव घेऊन स्वतःचा मोठेपणा सांगितला पाहिजे!" त्यानंतर त्यांनी नीला विखे पाटील यांचे अभिनंदन करत त्यांना 'अहिल्यानगरची सुपुत्री' असे संबोधले. लंके यांनी आपल्या पोस्टमध्ये विखे पाटील पिता-पुत्रांचे थेट नाव घेतलेले नसले, तरी ही पोस्ट नीला यांच्या विधानाच्या संदर्भात असल्याची चर्चा आहे.

नीला या शिक्षणतज्ज्ञ डॉ. अशोक विखे पाटील यांच्या कन्या, माजी केंद्रीय मंत्री दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांच्या नात आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुतणी आहेत. त्यांचा जन्म स्वीडनमध्ये झाला असला तरी त्यांचे बालपण अहिल्यानगरमध्ये गेले. अर्थशास्त्र आणि कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी स्वीडनच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेतला.

नीला यांच्या स्वीडनमधील राजकीय यशानंतर विखे पाटील कुटुंबाच्या पारंपरिक राजकीय वारशाची चर्चा महाराष्ट्रात सुरू झाली होती. मात्र, त्यांच्या ताज्या विधानानंतर आणि त्यावर निलेश लंके यांनी केलेल्या पोस्टमुळे या विषयाला आता अहिल्यानगरच्या स्थानिक राजकारणाचीही किनार मिळाली आहे.

### विखे-लंके राजकीय संघर्षाची पार्श्वभूमी

निलेश लंके आणि सुजय विखे पाटील यांच्यातील राजकीय संघर्ष २०२४च्या लोकसभा निवडणुकीत प्रकर्षाने समोर आला होता. अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातून लंके यांनी सुजय विखे पाटील यांचा पराभव केला होता. या निवडणुकीनंतर दोन्ही नेत्यांमधील राजकीय संघर्ष कायम चर्चेत राहिला आहे. सध्या सुजय विखे पाटील यांच्या निवडणुकीला आव्हान देणारी याचिकाही न्यायालयीन प्रक्रियेत आहे.

### स्वीडनच्या संसदेत नीला विखे पाटील

४१ वर्षीय नीला विखे पाटील यांची १३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या निवडणुकीत स्टॉकहोम सिटी मतदारसंघातून स्वीडनच्या संसदेसाठी निवड झाली. त्या ग्रीन पार्टीशी संबंधित असून यापूर्वी त्यांनी स्टॉकहोम सिटी कौन्सिलमध्ये काम केले आहे. स्वीडनच्या पंतप्रधान कार्यालयात राजकीय सल्लागार म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

### निला विखे पाटील कोण आहेत?

निला या शिक्षण तज्ञ डॉ. अशोक विखे पाटील यांच्या कन्या आणि आशिया खंडातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याची उभारणी करणारे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या त्या पणती, माजी केंद्रीय मंत्री दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांची नात व जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांची पुतणी आहेत.

# नागालँडमध्ये विषारी दारूचा हाहाकार!

## २ दिवसांत १९ जणांचा मृत्यू, ३ हजार बाटल्या जप्त; धक्कादायक माहिती समोर

**महाईन्यूज । नागालँड**

**नागालँडमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. विषारी दारू प्यायल्यामुळे मागच्या दोन दिवसांत तब्बल १९ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे नागालँडमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. नागालँडच्या मोकोकचुंग आणि तुएनसांग या दोन जिल्ह्यात ही घटना घडली आहे. या घटनेनंतर नागालँड सरकार अलर्ट मोडवर आलं असून या घटनेच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.**



नागालँडमध्ये विषारी दारूच्या सेवनामुळे २ दिवसांत १९ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर पोलिसांनी संशयास्पद भेसळयुक्त दारूच्या पुरवठ्याचा शोध घेण्यासाठी पथक रवाना केलं आहे. यासाठी एका विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. आतापर्यंत तब्बल ३ हजार भेसळयुक्त दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयास्पद विषारी दारूच्या सेवनामुळे मागील दोन दिवसांत मोकोकचुंग जिल्ह्यात ८ आणि तुएनसांग जिल्ह्यात ११ जणांचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे नागालँडमध्ये १९९० पासून दारूबंदी कायदा लागू आहे. मात्र, हा कायदा लागू असतानाही अशा प्रकारची घटना घडल्यामुळे खळबळ उडाली आहे.

विषारी दारूच्या सेवनामुळे १९ जणांच्या मृत्यूंनंतर नागालँड पोलिसांनी राज्यभरात अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत. या प्रकरणाशी संबंधित १९ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. तसेच पोलिसांनी आतापर्यंत ३ हजार मद्याच्या बाटल्या जप्त केल्या आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना एक महत्वाचं आवाहन केलं आहे. लेबल नसलेले किंवा संशयास्पद व बेकायदेशीर मद्य सेवन करण्यापासून लोकांनी दूर राहावं, अशा सूचना पोलिसांनी दिल्या आहेत. मद्यपान केल्यानंतर चक्कर येणं, अंधुक दिसणं, श्वास घेण्यास त्रास होणं किंवा बेशुद्ध पडणं अशी लक्षणं आढळल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी, असं आवाहनही करण्यात आलं आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी संशयास्पद मद्याच्या विक्री आणि पुरवठा साखळीचा शोध घेण्यासाठी तपास अधिक तीव्र केला आहे. राज्यातील विविध भागांमध्ये पोलिसांकडून छापेमारी सुरू असून संशयितांची चौकशी केली जात आहे. जप्त करण्यात आलेल्या मद्याच्या बाटल्यांची तपासणी करून त्यामध्ये नेमके कोणते रसायन किंवा विषारी पदार्थ मिसळले आहेत, याचा शोध घेतला जात आहे.

### तपासासाठी SIT स्थापन

विषारी दारूच्या सेवनामुळे २ दिवसांत झालेल्या १९ जणांच्या मृत्यूंची चौकशी करण्यासाठी आणि संशयास्पद भेसळयुक्त दारूचा स्रोत व पुरवठा साखळी शोधण्यासाठी आता विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आलं आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक आय. बुंगलांग चांग यांच्या नेतृत्वाखाली ही एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. दरम्यान, विषारी दारूच्या सेवनामुळे १९ जणांचा मृत्यू झाल्याच्या या घटनेचं नेमकं कारण शोधण्यासाठी आता दारूचे नमुने फॉरेन्सिक तपासणीसाठी गुवाहाटीला पाठवण्यात आले आहेत. “आम्हाला काही धागेदोरे मिळाले असून आता त्याबद्दल तपशील उघड करणं घाईचं ठरेल”, असं एका अधिकाऱ्याने सांगितलं आहे.

# अमेरिकन नौदलात पळापळ, बलाढ्य युद्धनौका समुद्रातून १२०० किमीपर्यंत हटल्या मागे

**महाईन्यूज । इराण**

**या वर्षी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमेरिकेने इस्राइलविरोधात सुरू केलं युद्ध अद्याप थांबलेलं नाही. दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात हल्ले प्रतिहल्ले सुरूच आहेत. यादरम्यान, अमेरिकन नौदलाने गेल्या काही आठवड्यांमध्ये इराणच्या आजूबाजूच्या सागरी परिसरातून मोठमोठी जहाजे मागे हटवली आहेत. सध्या ओमानचा उपसागर आणि अरबी समुद्रामध्ये अमेरिकेचं कुठलंही विमानवाहू जहाज आणि कुठलीही विनाशिका उपस्थित नसल्याचे उपग्रहीय छायाचित्रांमधून समोर आलं आहे. ही जहाजे सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीपासून बेपत्ता आहेत.**



अमेरिकन नौदलाच्या बड्याबड्या जहाजांनी समुद्रातून माघार घेण्यामागचं कारण हे इराणकडील कासिम बसीर नावाचं क्षेपणास्त्र असल्याचे सांगण्यात येत आहे. या क्षेपणास्त्राने पहिल्याचा वापरामध्ये अमेरिकन जहाजांसमोर मोठं आव्हान उभं केलं आहे, असा दावा इराणने केला आहे. तर अमेरिकन सेंट्रल कमांड सेंटकॉमने अमेरिकन जहाजे इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्याच्या टप्प्यात आली होती, असे सांगितले.

दरम्यान, कासिम बसीरने अमेरिकेसाठी नरकासारखी परिस्थिती निर्माण केली आहे. अमेरिकेने केलेली नाकेबंदी आता केवळ कागदावर अस्तित्वात आहे.मात्र ती लागू करणारी जहाजे खूप मागे सरकली आहेत, असा टोला इराणने लगावला आहे. कासिम बसीर ही कॅरियर किलर अर्थात मोठ्या युद्धनौकांना लक्ष्य करणारणी मिसाईल असल्याचा दावा इराणकडून केला जातो. त्याची रेंज सुमारे १२०० किमी पर्यंत आहे. तिचा युद्धात पहिल्यांदाच वापर करण्यात आल्याचा दावा केला गेल्यानंतर अमेरिकन नौदलाच्या ताफ्याने आपली जागा बदलली आहे. अमेरिकेकडील यूएसएस जॉर्ज वॉशिंग्टन, यूएसएस जॉर्ज. एच.डब्ल्यू बुश, एसएसएस ट्रिपोली आणि अनेक बर्क क्लास मधील डिस्ट्रॉयर मागे हटल्या आहेत. त्याशिवाय यूएसएस गेराल्ड फोर्ड आखातामधील समुद्रापासून खूप लांब निघून गेलं आहे.

### विजय यांच्या नेतृत्वाकडे लक्ष

सुरुवातीच्या काही महिन्यांतील कामगिरीवरून अंतिम निष्कर्ष काढण्याऐवजी सरकारच्या निर्णयांकडे सातत्याने पाहणे गरजेचे असल्याचे प्रकाश राज यांनी म्हटले. सरकारच्या आगामी अर्थसंकल्पातून त्यांची विकासाची दिशा अधिक स्पष्ट होईल, असेही त्यांनी संकेत दिले. रोजगार, पायाभूत सुविधा, शिक्षण आणि सामाजिक कल्याणाच्या मुद्द्यांवर सरकारची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. पुढील काळात सरकार घेत असलेल्या निर्णयांवर जनतेची प्रतिक्रिया काय राहते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.

# The Vvaan चित्रपटातील देवीचे मंदिर कुठे आहे?



सिद्धार्थ मल्होत्रा आणि तमन्ना भाटिया यांच्या 'द वन : फोर्स ऑफ द फॉरेस्ट' या चित्रपटामुळे बिहारमधील एका अपरिचित देवी मंदिराची चर्चा सुरू झाली आहे. पाटणा जिल्ह्यातील बिहटा परिसरातील माँ वन देवी मंदिराशी संबंधित लोककथा या चित्रपटासाठी प्रेरणादायी ठरल्या आहेत. पवित्र जंगल, गूढ आख्यायिका आणि सूर्यास्तानंतर या परिसरात प्रवेश करू नये, अशी वर्षानुवर्षांची स्थानिक मान्यता यामुळे हे मंदिर विशेष ठरते. चित्रपटाची कथा लिहिण्याआधी निर्माते आणि लेखकांनी या मंदिराला भेट दिली होती. लेखक अरुणाभ कुमार आणि दिग्दर्शक दीपक कुमार मिश्रा यांनी मंदिराला भेट देऊन तेथील पुजारी, ग्रामस्थ आणि स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. वन देवीशी संबंधित आख्यायिका आणि लोककथा जाणून घेतल्या. वन देवी मंदिर बिहारमधील पाटणा जिल्ह्यातील बिहटा परिसरात आहे. पाटण्यापासून हे मंदिर सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे देवीची पारंपरिक मोठी मूर्ती नाही. येथे पवित्र पिंडीच्या रूपात वन देवीची पूजा केली जाते. हीच पिंड मंदिरातील मुख्य आराध्य मानली जाते. मंदिराभोवती पूर्वी दाट जंगल असल्याचे सांगितले जाते. आजही मंदिराचा परिसर तुलनेने शांत आणि एकांतात आहे. मंदिराभोवतीच्या लोककथा आणि धार्मिक श्रद्धांमुळे बिहारच्या धार्मिक परंपरा आणि लोकसंस्कृतीचा अभ्यास करणाऱ्यांसाठी हे ठिकाण विशेष ठरते.



## फातिमा सना शेख संतापली

बिहारच्या जमुईमध्ये अलीकडेच एका अल्पवयीन मुलीसोबत घडलेल्या घटनेने पुन्हा एकदा महिला सुरक्षेचा आणि समाजाच्या विकृत मानसिकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त होत आहे. आता अभिनेत्री फातिमा सना शेख हिनेही या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. "आपण महिलांची मोरल पुलिसिंग करणे थांबवले पाहिजे आणि त्याऐवजी पुरुषांची मोरल पुलिसिंग सुरू केली पाहिजे. त्यामुळे मोठा बदल घडू शकतो." "असे फातिमाने म्हटले आहे. एका मुलाखतीत बोलताना अभिनेत्री फातिमा सना शेखने महिलांवरील अत्याचार, मॉरल पोलिसिंग आणि सोशल मीडियावरील बॉडी शेमिंगवरून रोखठोक मते मांडली. फातिमा म्हणाली की, ती १७ वर्षांची मुलगी केवळ आईस्क्रीम खाण्यासाठी बाहेर गेली होती. तिच्यासोबत जे घडले ते अत्यंत निंदनीय आहे. आज आपण २०२६ मध्ये जगत आहोत, तरीही महिलांवर अशा प्रकारच्या घटना घडत आहेत, हे अत्यंत लाजिरवाणे आहे. समाजात अजूनही ही अत्यंत हीन आणि नीच मानसिकता कायम असल्याचे तिने म्हटले. या प्रकरणात एका १७ वर्षांच्या मुलाने दाखवलेल्या धैर्याचे तिने कौतुक केले, मात्र अशी वेळ कोणावरही येऊ नये, अशी खंतही तिने व्यक्त केली आहे. महिलांच्या नैतिक तपासणीबाबतही फातिमाने आपली स्पष्ट मते मांडली. ती म्हणाली, "आता आपण सातत्याने महिलांची मोरल पुलिसिंग करणे थांबवून पुरुषांची सुरू केली पाहिजे.



## हिरोच्या पत्नीला तू आवडत नाही

अभिनेत्री तापसी पन्नू तिच्या स्पष्ट वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असते. नुकतेच तिने एका चित्रपटातून तिला काढून टाकण्यात आले होते, त्याबाबतचा अनुभव सांगितला आहे. 'एका चित्रपटातून मला एका अभिनेत्याच्या पत्नीला मी आवडत नसल्यामुळे सिनेमातून रिप्लेस करण्यात आलं होतं,' असा दावा तापसीने केला. एका मुलाखतीत तापसी पन्नूने सांगितले की, "सिनेमाच्या लीड हिरोने मला रिप्लेस करण्यास सांगितलं असल्याचे मला सांगण्यात आलेलं होते. मी अनेकदा यामागच्या कारणांचा अंदाज लावण्याचा प्रयत्न केला. कदाचित त्यांना असुरक्षित वाटत असेल किंवा त्यांना त्यांच्या जवळच्या व्यक्तीला सिनेमात घ्यायचं असेल. कारणं अनेक असू शकतात. पण मला कधीही ठोस कारण सांगण्यात आलं नाही." असे ती म्हणाली. जेव्हा तिने वारंवार सिनेमातून बाहेर काढण्याचं कारण विचारल्यानंतर तिला केवळ एवढंच उत्तर मिळालं की, "हिरोला तुम्ही या सिनेमाचा भाग असावं असं वाटत नाही. कारण हिरोच्या पत्नीला तुम्ही आवडत नाही, असं मला सांगण्यात आलं. आजपर्यंत मला समजलेलं नाही की त्यांना माझ्याशी नेमकी काय अडचण होती." मात्र, तापसीने या मुलाखतीत संबंधित अभिनेत्याचं किंवा त्याच्या पत्नीचं नाव उघड केलेलं नाही. दरम्यान, तापसीने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील तामिळ, तेलगू, मल्याळम भाषांतील अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

# कबड्डीमध्ये भारताचा डबल धमाका!

## महिला संघापाठोपाठ पुरुष कबड्डी संघाची नवव्यांदा सुवर्णपदकावर मोहोर

**महाईन्यूज । मुंबई**

**आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष कबड्डी संघाने आपले ऐतिहासिक वर्चस्व कायम राखत, अंतिम सामन्यात इराणविरुद्धच्या अटीतटीच्या लढतीत ४०-३४ अशा शानदार विजयासह सुवर्णपदक जिंकले.भारताने कबड्डीमध्ये सुवर्णपदकांची दुहेरी कामगिरी साध्य केली. महिला संघाने इराणचा ३७-३४ असा पराभव केल्यानंतर, पुरुष संघानेही इराण संघाचा ४०-३४ असा पराभव करत रोमांचक अंतिम सामना जिंकला.**



भारत आणि इराण यांच्यातील सामना पहिल्या हाफ अत्यंत चुरशीचा झाला. इराणने सुरुवातीला आक्रमक खेळ केला; परंतु भारताने जोरदार पुनरागमन केले. तरीही, भारताला ही लय कायम राखता आली नाही. इराणच्या खेळाडूंनी दबाव वाढवला. या काळात भारताने 'सुपर टॅकल'द्वारे गुण मिळवत आघाडी घेतली. मात्र, भारत ही आघाडी फार काळ टिकवू शकला नाही; इराणने भारताला 'ऑल-आउट' केले आणि त्यातून चार गुण मिळवले. यामुळे इराणला १४-१३ अशी आघाडी मिळाली. 'ऑल-आउट'नंतर भारताने पुन्हा सावरण्याचा प्रयत्न केला; पण पहिल्या सत्राच्या अखेरीस इराणने १८-१७ अशी निसटती आघाडी घेतली होती.

दुसऱ्या सत्रात भारतीय संघाने जबरदस्त पुनरागमन केले. पहिल्या सत्रात पिछाडीवर पडल्यानंतर त्यांनी इराणविरुद्ध आक्रमक खेळ केला, इराणच्या संघाला 'ऑल-आउट' करत आघाडी घेतली. सामन्यात १० मिनिटे शिल्लक असताना भारताकडे इराणपेक्षा पाच गुणांची आघाडी होती. भारताच्या या आक्रमक खेळामुळे इराणच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. भारताने आपली आघाडी वेगाने वाढवली, खेळातील लय कायम ठेवली. इराणच्या संघावर सतत दबाव टाकला. सामन्याच्या अंतिम क्षणांत अस्लमने उत्कृष्ट कामगिरी केली; इराणच्या बचावपटूंनी वेढा घातलेला असतानाही त्याने चातुर्याने 'वॉक लाइन' ओलांडली. यामुळे भारताची इराणवरील आघाडी नऊ गुणांपर्यंत पोहोचली. इराणच्या प्रत्येक आक्रमणाला भारताने चोख प्रत्युत्तर देत सुवर्णपदकावर आपलं नाव कोरलं.

महिला संघानेही इराणवर ३७-३४ अशी मात करून आपले विजेतेपद कायम राखले आणि भारतीय कबड्डीसाठी ही दुहेरी कामगिरी अविस्मरणीय ठरवली. या दोन सुवर्णपदकांमुळे भारताची एकूण पदकांची संख्या २८ वर पोहोचली आहे; यात चार सुवर्ण, ११ रौप्य आणि १३ कांस्यपदकांचा समावेश आहे.

### आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे वर्चस्व

पुरुषांची अंतिम सामन्यात एका टप्प्यावर गुणसंख्या २०-२० अशी बरोबरीत होती; परंतु भारताने आघाडी घेत आणखी एक सुवर्णपदक जिंकले. अपवाद २०१८ च्या जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेपूर्वी भारतीय पुरुष संघाने सलग सात सुवर्णपदके जिंकली होती. मात्र जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत इराण संघाने सुवर्णपदक पटकावले होते. तर भारत चौथ्या स्थानावर राहिला होता. २०२३ च्या हांगझोऊ स्पर्धेत भारताने कबड्डी संघाने पुनरागमन करत पुन्हा एकदा आशियाई स्पर्धेत विजेतेपद पटकावले. आता जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत अजिंक्यपदा कायम ठेवले.

## इराणचा पराभव करत भारतीय महिला कबड्डी संघाने पटकावले सुवर्णपदक

**महाईन्यूज । मुंबई**

**आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला कबड्डी संघाने आज (दि. २६) झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात इराणचा ३७-३४ असा पराभव करून तिसरे सुवर्णपदक जिंकले. या शानदार विजयामुळे गतविजेत्या भारतीय संघाने आपले सुवर्णपदक यशस्वीरीत्या राखले असून, भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.**



### रोमांचक अंतिम सामना आणि भारताचा संयम

सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात इराणने जोरदार पुनरागमनाचा प्रयत्न केला, तरीही भारतीय खेळाडूंनी संयम राखला. सामना संपायला एक मिनिट बाकी असताना इराणला गुण मिळवणे गरजेचे होते, परंतु भारताच्या बचावफळीने 'आयनाझ'वर महत्त्वपूर्ण पकड करत विजयावर शिक्कामोर्तब केले. अखेरीस भारताने ३७-३४ असा विजय मिळवत आपल्या पदकांच्या यादीत आणखी एका सुवर्णपदकाची भर घातली. महिलांच्या कंपाऊंड पात्रता फेरीत चिकिता तनिपार्थी हिने ७०५ गुणांसह पहिले स्थान मिळवले.

संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संजू देवीने या निर्णायक सामन्यातही महत्त्वाची भूमिका बजावली आणि भारतीय संघाने इराणचे आव्हान यशस्वीपणे परतवून लावले. या सुवर्णपदकामुळे भारताच्या पदकांची एकूण संख्या २७ झाली आहे (यात ३ सुवर्ण, ११ रौप्य आणि १३ कांस्य पदकांचा समावेश आहे) या पदकापर्यंत भारत पदक तालिकेत १२ व्या स्थानावर होता. भारताच्या सुवर्णविजेत्या महिला संघात पूजा, राज राणी, सोनाली विष्णू शिंगटे, पुष्पा, भावना देवी, रितू, संजू देवी, रितू नेगी, मनीषा कुमारी, पिंकी रॉय, ज्योती आणि निकिता यांचा समावेश होता.

आजच भारतीय पुरुष कबड्डी संघही मैदानात उतरेल; सुवर्णपदकाच्या लढतीत त्यांचा सामना इराणशी होणार आहे. तत्पूर्वी, सावन बरवालने पुरुषांच्या मॅराथॉनमध्ये २:११:३७ या वेळेसह राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करत रौप्यपदक जिंकले. या कामगिरीसह आशियाई क्रीडा स्पर्धेतील मॅराथॉन प्रकारात पदक जिंकण्यासाठी भारताने केलेली ४४ वर्षांची प्रतीक्षा संपली.

आशि चौकसे, तिलोत्तमा सेन आणि विदर्सा विनोद यांनी महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स सांघिक प्रकारात रौप्यपदक जिंकले. वैयक्तिक अंतिम फेरीत तिलोत्तमा चौथ्या, तर विदर्सा पाचव्या स्थानावर राहिली. स्क्वॅशमध्ये, मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत हाँगकाँगच्या टँग मिंग हाँग आणि ली का यी यांच्याकडून पराभव पत्करल्यानंतर जोशना चिनप्पा आणि वेलवन सेंथिलकुमार यांनी कांस्यपदक जिंकले.

तिरंदाजीमध्ये पात्रता फेरीत उल्लेखनीय कामगिरी पाहायला मिळाली; धीरज बोम्मादेवरा याने ६९८ गुणांसह पुरुषांच्या रिकर्व्ह पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावतानाच आशियाई आणि राष्ट्रीय विक्रमही प्रस्थापित केले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 27 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY


VLSI | Savitribai Phule Pune University | iCiT

## Employability Enhancement

## ADVANCE COURSE IN EMBEDDED SYSTEM DESIGN WITH AI

Course Modules

1. C++ Programming and Data Structure Algorithm
2. Embedded Operating System, Linux Device Driver and RT LINUX
3. Micro Controller Programming and Interfacing
4. Artificial Intelligence in Embedded System Design
5. Model based Development using MATLAB Simulink (Optional)
6. Embedded System Hardware Design & Project




INDUSTRY EXPERT FACULTY

10000+ STUDENTS SUCCESSFULLY COMPLETED OUR VARIOUS COURSES

25 YEARS OF EXPERIENCE IN EDUCATION

100% PLACEMENT ASSISTANCE

ADMISSIONS OPEN | APPLY NOW >

8669668900 | 9922219219 | www.icit.org.in | info@icit.org.in

# पिंपरी-चिंचवडमध्ये २९ सप्टेंबरला 'रोजगार महाकुंभ'

## पाचवी उत्तीर्ण ते उच्चशिक्षित उमेदवारांसाठी संधी; ऑटो क्लस्टर येथे विविध क्षेत्रांतील कंपन्यांचा सहभाग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहर आणि परिसरातील रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुण-तरुणींसाठी मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ' आयोजित करण्यात आला आहे. चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमध्ये सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत हा मेळावा होणार असून, पाचवी उत्तीर्ण उमेदवारांपासून उच्चशिक्षित तरुणांपर्यंत विविध पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे.**




आमदार सौ. उमाताई खापरे यांच्या पुढाकारातून, अनुप मोरे, तुषार हिंगे आणि जयदीप खापरे यांच्या माध्यमातून तसेच 'युवा हब स्किल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड' व विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मंगलप्रभात लोढा यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाला रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.




### नोकरी न मिळालेल्या उमेदवारांसाठी 'जॉब कार्ड'

मेळाव्यात तात्काळ नोकरी न मिळालेल्या उमेदवारांची माहिती पुढील संधींसाठी संकलित करण्याकरिता 'जॉब कार्ड' उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये उमेदवाराची शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि अपेक्षित रोजगार यांची नोंद केली जाईल. भविष्यात उपलब्ध होणाऱ्या योग्य संधींशी उमेदवारांना जोडण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे आणि अद्ययावत बायोडाटा घेऊन २९ सप्टेंबर रोजी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन अनुप मोरे, तुषार हिंगे आणि जयदीप खापरे यांनी केले आहे.

### कंपन्यांशी थेट संवादाची संधी

बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, बीपीओ, केपीओ, स्थावर मालमत्ता, उत्पादन, वाहन उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील कंपन्यांचे प्रतिनिधी मेळाव्यात सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यांच्या माहितीनुसार, Axis Bank, ICICI Bank, Tata Motors, Hudas Technology, Wiggle Space, Bajaj आणि Hyundai यांसारख्या कंपन्यांचा सहभाग अपेक्षित आहे. उमेदवारांना त्यांच्या शिक्षण आणि कौशल्यानुसार उपलब्ध संधींची माहिती घेता येईल. पाचवी, दहावी, बारावी उत्तीर्ण उमेदवारांसह आयटीआय, पदविका, पदवी आणि अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या तरुणांसाठीही हा मेळावा खुला आहे. त्यामुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या विविध शैक्षणिक पार्श्वभूमीच्या उमेदवारांना एकाच ठिकाणी संधी मिळणार आहे.

# 'विश्वास ठेवण्यापूर्वी विचार करा'चा संदेश देत सायबर जनजागृती सामूहिक उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**क्विक हील फाउंडेशन आणि एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (MIT ACSC), आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर वॉरियर्स क्लबच्या माध्यमातून 'थिंक बिफोर यू ट्रस्ट' (विश्वास ठेवण्यापूर्वी विचार करा) या विषयावर सायबर जनजागृती सामूहिक उपक्रमाचे आयोजन २२ सप्टेंबर रोजी रात्री ७:३० वाजता एमआयटी एसीएससी, आळंदी येथे करण्यात आले.**



वाढत्या सायबर फसवणुकीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि डिजिटल व्यवहार करताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमामध्ये लाडकी बहीण योजनेच्या पेमेंटच्या पडताळणीच्या नावाखाली ओटीपी मागून फसवणूक करण्याचा प्रयत्न नाट्यरूप सादरीकरणातून दाखवण्यात आला. एखादी व्यक्ती स्वतःला बँक किंवा शासकीय विभागातून बोलत असल्याचे सांगत असली, तरी कोणतीही गोपनीय माहिती देण्यापूर्वी तिची अधिकृत माध्यमातून पडताळणी करणे आवश्यक असल्याचा संदेश या सादरीकरणातून देण्यात आला.

सादरीकरणामध्ये माधुरी यांनी आजीची, मानसी यांनी आईची आणि गायत्री यांनी मुलीची भूमिका साकारली. सादरीकरणादरम्यान गायत्रीने वेळीच ओटीपी शेअर करण्यापासून कुटुंबाला थांबवून सायबर फसवणूक कशी ओळखावी, याबाबत जागरूक केले. यानंतर पाच सायबर वॉरियर्सनी ओटीपी फसवणूक, बनावट लिंक, अनोळखी एपीके फाइल, क्यूआर कोड फसवणूक आणि सार्वजनिक वाय-फायचा असुरक्षित वापर याबाबत मार्गदर्शन केले. अनोळखी व्यक्तीला ओटीपी, पिन, पासवर्ड किंवा बँकिंगशी संबंधित माहिती देऊ नये, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये, अनोळखी एपीके किंवा फाइल डाउनलोड करू नये आणि क्यूआर कोड स्कॅन करण्यापूर्वी त्याची खात्री करावी, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमातून "घाबरू नका, घाई करू नका, आधी पडताळणी करा आणि मगच विश्वास ठेवा" हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. उपक्रमाच्या शेवटी सायबर वॉरियर्सनी "थांबा! विचार करा! पडताळणी करा! आणि मगच विश्वास ठेवा!" तसेच "जागरूक रहा — सुरक्षित रहा!" असा संदेश देत सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती केली.

# D. Y. Patil Institute Hosts Grand Induction Programme

## for FYMCA & FYMBA Batch of 2026–27 AKURDI, PUNE — D. Y. Patil

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**

**Institute of Master of Computer Applications and Management (DYPIMCAM), Akurdi, successfully organized its annual Induction Programme for the incoming First-Year MCA and MBA batches for the Academic Year 2026–2027 on Tuesday, September 22, 2026, at the Shantai Auditorium. The event was graced by Dr. Abhay Jere, Managing Director & CEO of DEXIT Global, as the Chief Guest, and Mr. Gopal Parasnis, Vice President & Global Head for Digital Transformation at Tech Mahindra, as the Guest of Honour.**




The formal proceedings began in the morning with student registrations and breakfast, followed by the auspicious Saraswati Pooja and traditional lighting of the lamp. In her welcome address, Dr. K. Nirmala, Director of DYPIMCAM, welcomed the new cohort and emphasized three critical pillars for student success: the necessity of lifelong learning, continuous skill adoption to keep pace with rapid technological advancements, and the vital role of strong communication skills in professional life. Following her address, the institute recognized academic excellence by felicitating student toppers with certificates and medals.

Eminent leaders from industry and academia shared valuable perspectives with the incoming students:

Dr. Abhay Jere (Chief Guest): Managing Director & CEO of DEXIT Global (former Vice Chairman of AICTE and Chief Innovation Officer, Ministry of Education, Govt. of India) urged students to transition from a rote-learning mindset to a creative, problem-solving mindset. He detailed the Design Thinking methodology—focusing on identifying real-world problems and building iterative solutions. Dr. Jere also highlighted rupee valuation, financial planning, lifelong learning and also illustrated examples for adaptability and disruption in modern markets.

Mr. Gopal Parasnis (Guest of Honour): Vice President & Global Head for Digital Transformation at Tech Mahindra. He shared three positive approaches for career growth: embracing change, maintaining continuous curiosity, and driving collaborative, team-based problem solving.

RAdm Amit Vikram (Retd): Hon. Campus Director, encouraged students to cultivate discipline, personal responsibility, and academic rigor throughout their campus life.

Ms. Jasmita Kaur: Dean Campus Placements, DDYPEC, Akurdi, outlined key career readiness strategies and placement opportunities awaiting the incoming students.

The program concluded with a formal vote of thanks delivered by Dr. Kavita Suryawanshi, Head of MCA Department and Vice Principal, followed by the National Anthem and a group photograph. The event was organized and convened by Mr. Rahul Chaudhari and Ms. Girija Paranjpe.

# शालेय जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धेत राजमाता जिजाऊ मुलांचा संघ सलग तिसऱ्यांदा प्रथम

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**एच. ए. स्कूल पिंपरी येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धेत 19 वर्षाखालील मुलांच्या गटात राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय लांडेवाडी भोसरी येथील मुलांच्या संघाने एच. ए. स्कूल पिंपरी च्या संघाचा 8-4 अशा 4 गुणांच्या फरकाने सलग तिसऱ्यांदा विजेते पद मिळवले.**



त्यामुळे प्रथम क्रमांक प्राप्त या सर्व खेळाडूंची शालेय विभागस्तरीय डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या संघामध्ये कु. सुरज ढमढेरे, मुआज खान, मयूर धोत्रे, कु. कुणाल शिंदे, सुरज बुरुड, विश्वजीत ओव्हाळ, यशराज जाधव, हिमांशू शर्मा, मयुरेश जाधव, सुरज बुरुड, यश शिंदे, अमन शेख, रवींद्र गायकवाड, इत्यादी खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्री अजित भाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीर मुंगसे सर,पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

# डॉ. डी. वाय. पाटीलमध्ये MCA इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

## AI युगातील आव्हानांसाठी विद्यार्थ्यांना सज्ज करण्यासोबतच कौशल्यविकास, करिअर मार्गदर्शन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, वराळे येथील एम.सी.ए. (MCA) विभागात नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'Envision 2026 – MCA Induction Program' चे भव्य आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुशांत पाटील आणि सी.ई.ओ. (CEO) अॅड. अनुजा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.**





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. सुरेश शिरबहादूरकर यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) वेगाने बदलणाऱ्या युगासाठी स्वतःला सज्ज करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी डीन डॉ. योगेश गुरव यांनी करिअरमधील सातत्यपूर्ण शिक्षण आणि कौशल्यविकासाचे (Skill Development) महत्त्व अधोरेखित केले. MCA विभागप्रमुख प्रा. मनीष राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत करून विभागातील शैक्षणिक उपक्रम व भविष्यातील व्यावसायिक संधींची सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून 'एरिक रोबोटिक्स, पुणे' येथील एच.आर. हेड (HR Head) सुश्री गौरी ठोंबरे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगतातील अपेक्षा, भरती प्रक्रिया आणि मुलाखतीची तयारी याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, भविष्यात प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले.

इंडक्शन प्रोग्रामच्या दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध प्रशिक्षक सुश्री प्रज्ञा अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ३ तासांचे विशेष 'सॉफ्ट स्किल्स वर्कशॉप' (Soft Skills Workshop) आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन MCA द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी खुशी रे आणि समृद्धी पाटील यांनी केले. प्रा. सुष्टी हिंगे यांच्या कुशल समन्वयातून, तसेच MCA विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# Campus Recruitment Drive by MindLyft AI Successfully Conducted at D. Y. Patil

**MahaEnews I**
**PIMPRI-CHINCHWAD**

**Dr. D. Y. Patil Technical Campus, Varale-Talegaon, successfully organized a Campus Recruitment Drive in collaboration with MindLyft AI, providing students with an excellent opportunity to explore career prospects and showcase their skills before industry professionals.**



The recruitment drive witnessed an enthusiastic response from the students, with 78 students registering and participating in the recruitment process. The drive was conducted at the Technical Campus, where students engaged in the various stages of the selection process.

The initiative reflects the institution's continued commitment to strengthening industry-academia collaboration and creating meaningful employment opportunities for students. Such recruitment drives enable students to gain valuable exposure to industry expectations while providing organizations with an opportunity to identify emerging talent.

The institution expressed its sincere gratitude to Team MindLyft AI for conducting the recruitment drive and providing students with this valuable career opportunity. Special appreciation was also extended to the Training and Placement (T&P) Cell, Faculty Coordinators, and student Volunteers whose dedicated efforts contributed significantly to the smooth and successful execution of the event.

With the recruitment process now completed, the results are awaited. The institute extends its best wishes to all 78 participating students and hopes that their efforts will lead to promising career opportunities.

Dr. D. Y. Patil Technical Campus looks forward to hosting more such recruitment initiatives and strengthening its association with leading organizations to support students in building successful professional careers.

**Results Awaited — Stay Tuned for Further Updates!**